بسم اللہ الرحمن الرحیم نحمدہ و نصلی علی رسولہ الکریم و علی عبدہ المسیح الموعود

لا الٰہ الا اللہ محمد رسول اللہ

دفتر مجلس انصار اللہ بھارت

Office Of The Majlis Ansarullah Bharat

Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA

Ph:+91-1872-220186, Fax: +91-1872-224186, Mob. +91-98154-94687, E-mail:ansarullahbharat@gmail.com

نمبر حوالہ/Ref ______ تاریخ/Date ______


# हजरत मुहम्मद ﷺ यांचे सत्यनिष्ठ सेवक, हजरत मसीह मौऊद (अ.स.) यांच्या गरीबांप्रती करुणा, उदारता आणि दानशूरतेचे प्रेरणादायी स्मरण

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهٗ لَا شَرِيْكَ لَهٗ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهٗ وَرَسُوْلُهٗ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ۔
بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ۔ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ۔
إِيَّاكَ نَعْبُدُ وَإِيَّاكَ نَسْتَعِيْنُ۔ اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ۔
صِرَاطَ الَّذِيْنَ أَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ۔

शुक्रवारच्या खुतब्याचा सारांश — सय्यदना अमीरुल मोमिनीन, हजरत मिर्झा मस्रूर अहमद, खलीफतुल मसीह पाचवे (अल्लाह त्यांना आपली विशेष मदत आणि संरक्षण प्रदान करो) यांनी २६ जून २०२६ (२६ एहसान १४०५ हिजरी शम्सी) रोजी, मुबारक मशिद, इस्लामाबाद, युनायटेड किंगडम येथे दिलेल्या खुतब्याचा सारांश.

**तशहहुद, तअव्वुझ आणि सूरह अल-फातिहा यांचे पठण झाल्यानंतर, हजरत अमीरुल मोमिनीन अय्यदहुल्लाहु तआला बिनस्रिहिल अज़ीज यांनी फरमावले:**

अल्लाह तआलाच्या आदेशानुसार आणि हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या आदर्शाचे अनुसरण करत, हजरत मसीह मौऊद (अलैहिस्सलाम) यांच्या जीवनात गरिबांप्रती करुणा, उदारता आणि दानशीलतेची अनेक उदाहरणे आढळतात. आपल्या दाव्याच्या काळापुरतेच नव्हे, तर आपल्या जीवनाच्या प्रारंभीच्या टप्प्यात आणि तरुणपणातही आपल्या उच्च नैतिक चारित्र्याची अनेक उदाहरणे आपल्याला आढळतात.

अल्लाह तआलाने ज्या मातोश्रींच्या कुशीत हजरत मसीह मौऊद (अलैहिस्सलाम) यांचे संगोपन केले त्यांच्या जीवनाकडे पाहिले तरीही गरीबांविषयीची करुणा, उदारता आणि दानशूरपणाची अनेक उदाहरणे दिसून येतात. यावरून स्पष्ट होते की, हजरत मसीह मौऊद (अलैहिस्सलाम) यांचे संगोपन अशा एका मातोश्रींच्या कुशीत झाले, ज्यांनी त्यांना उच्च नैतिक मूल्ये आणि उत्तम चारित्र्याचे संस्कार दिले. हजरत शेख याकूब अली इरफानी (रज़ि.) लिहितात की, हजरत माई चिराग साहिबा, म्हणजेच हजरत अक्दस (अलैहिस्सलाम) यांच्या आदरणीय मातोश्रींचे कुटुंब आइमा होशियारपूर जिल्हा या गावातील एक प्रतिष्ठित आणि अस्सल मुघल घराणे होते. त्यांच्या

स्वभावात उदारता, दानशीलता आणि अतिथी-सत्काराची भावना ओतप्रोत भरलेली होती. एका पवित्र, शीलव्रती आणि चारित्र्यसंपन्न स्त्रीमध्ये जे उच्च सद्‌गुण अपेक्षित असतात, ते सर्व गुण त्यांच्यामध्ये विद्यमान होते. त्या नेहमी प्रसन्न, हसतमुख आणि गंभीर स्वभावाने वागत असत. अतिथी-सत्काराबद्दल त्यांच्या अंतःकरणात विलक्षण उत्साह होता आणि त्यांचे हृदय अत्यंत विशाल व उदार होते. जर त्यांना चार व्यक्तींसाठी अन्न पाठविण्याची विनंती मिळाली, तर त्या इतके अन्न पाठवत की ते आठ किंवा त्याहून अधिक व्यक्तींनाही पुरेसे होई. आपल्या नगरातील गरीब, गरजू आणि दुर्बल लोकांची त्या विशेष काळजी घेत असत. त्यांच्या दैनंदिन सद्‌गुणांपैकी एक उल्लेखनीय गोष्ट अशी होती की, शहरातील गरीब व्यक्तींच्या निधनानंतर त्यांच्या कफनाची व्यवस्था त्यांच्या घरूनच केली जात असे.

हजरत मियाँ अल्लाह यार (रज़ि.) वर्णन करतात की, ज्या काळात हजरत अक्दस (अलैहिस्सलाम) सियालकोट येथे नोकरी करत होते, त्या वेळी एकदा त्यांच्या आदरणीय मातोश्रींनी त्यांच्यासाठी दोन जोड कपडे आणि काही पिन्न्या (पारंपरिक गोड पदार्थ) मंगळ नाई (हजाम) नावाच्या व्यक्तीबरोबर पाठविल्या. ते पुढे सांगतात: “जेव्हा मी या वस्तू घेऊन सियालकोटला पोहोचलो आणि हजरत अक्दस (अलैहिस्सलाम) यांच्या समोर ठेवल्या, तेव्हा त्यांनी प्रेमाने फरमावले, ‘यांपैकी तुझ्या वाट्याला जे येते ते तू घे आणि माझ्या वाट्याचे मला दे.’मी नम्रपणे अर्ज केला, ‘हुजूर! या सर्व वस्तू खास आपल्यासाठी आहेत. आपल्या आदरणीय मातोश्रींनी त्या आपल्यासाठी पाठविल्या आहेत.’त्यावर त्यांनी पुन्हा फरमावले, ‘तू या सर्व वस्तू इतक्या दूरवरून वाहून आणल्या आहेत; म्हणून त्यांपैकी निम्मा हिस्सा तू अवश्य घे.’शेवटी त्यांनी मला एक जोड कपडे आणि काही पिन्न्या दिल्या. त्यानंतर त्यांनी फरमावले, ‘अम्मा जान यांना जाऊन सांग की, मला लवकर परत बोलावून घ्यावे. येथे माझे मन लागत नाही.’

हजरत मिर्झा बशीर अहमद (रज़ि.) एक  (रिवायत) वर्णन करतात की, हजरत साहिब (अलैहिस्सलाम) सियालकोट येथे वास्तव्यास असताना घरातील कोणालाही फारसे भेटत नसत. त्यांना मिळणारा पगार ते गरजू आणि निराधार लोकांमध्ये वाटून टाकत असत. कधी त्यांच्यासाठी कपडे शिवून देत, तर कधी रोख रक्कम देत. स्वतःसाठी ते केवळ अन्नाचा खर्च ठेवत आणि उर्वरित सर्व रक्कम गरजूंवर खर्च करत असत. प्रारंभीच्या काळात हजरत अक्दस (अलैहिस्सलाम) एकांतप्रिय होते आणि त्यांचाही स्वभाव तसाच असल्यामुळे त्यांच्या या उच्च नैतिक गुणांचे प्रकटीकरण अत्यंत शांतपणे आणि फारसे लोकांच्या नजरेत न येता होत असे. परंतु जेव्हा अल्लाह तआलाने त्यांना सार्वजनिक कार्यासाठी पुढे आणले, लोक मोठ्या संख्येने त्यांच्याकडे येऊ लागले आणि त्यांच्या जीवनातील विविध पैलू सर्वांसमोर प्रकट होऊ लागले, तेव्हा त्या घटनांचे प्रत्यक्ष साक्षीदारही निर्माण झाले आणि त्या पुढे सांगणारेही अनेक झाले. याच काळात त्यांच्या उदारता, करुणा आणि उच्च चारित्र्याचे असंख्य प्रसंग लोकांसमोर आले. कोणताही याचक त्यांच्या दारातून कधीही रिकाम्या हाताने परत जात नसे.

हजरत मौलाना अब्दुल करीम (रज़ि.) फरमावतात की एके दिवशी असं घडलं की असरची नमाज अदा केल्यानंतर हजरत अक्दस (अलैहिस्सलाम) उठले आणि मशिदीत आत जाण्यासाठी खिडकीत पाऊल ठेवले. इतक्यात एका याचकाने हळू आवाजात म्हटले, मी एक गरजू याचक आहे.’त्या वेळी हजरतांना एक महत्त्वाचे कामही होते आणि त्या याचकाचा मंद आवाज इतर लोकांच्या आवाजात मिसळून गेला होता. त्यामुळे हजरत (अलैहिस्सलाम) आत गेले. परंतु त्या मंद आवाजाने त्यांच्या

हृदयावर खोल परिणाम केला. त्यांनी तत्क्षणी हजरत हकीम मौलवी नूरुद्दीन (रज़ि.) यांना हाक मारून फरमावले, ‘एक याचक होता त्याला शोधा.’बराच शोध घेऊनही तो सापडला नाही. संध्याकाळी नमाजनंतर हजरत (अलैहिस्सलाम) पुन्हा बसले असता तोच याचक पुन्हा आला आणि त्याने मदतीची विनंती केली. हजरतांनी तत्काळ आपल्या खिशातून काही रक्कम काढून त्याच्या हातात ठेवली. त्यानंतर त्यांच्या मुखमुद्रेवर अशी प्रसन्नता दिसून आली की, जणू त्यांच्या मनावरील एखादे मोठे ओझे उतरून गेले होते. कादियानपासून सुमारे सहा मैलांवर सठियाली नावाचे एक छोटेसे गाव आहे. तेथून एक जाट फकीर नेहमी येत असे. तो मुबारक मशिदीच्या छपराखाली, खिडकीजवळ येऊन मोठ्याने हाक मारत असे, “गुलाम अहमद! मला एक रुपया हवा आहे,आणि तेथेच बसून राहत असे. जर हजरत अक्दस (अलैहिस्सलाम) एखाद्या कामात व्यस्त असत, तर तो थोड्या-थोड्या वेळाने पुन्हा पुन्हा अशी हाक मारत असे. हे अनेकांना अप्रिय वाटे.परंतु जर हजरत अक्दस (अलैहिस्सलाम) यांना कळले की कोणीतरी त्या फकीराला काही कठोर शब्द बोलले आहेत, तर त्यांना ते अजिबात आवडत नसे. ते हसतमुखाने त्याला एक रुपया देत आणि प्रेमाने निरोप देत असत.

सन १९०५ मध्ये हजरत अक्दस (अलैहिस्सलाम) शेवटच्या वेळेस दिल्लीला गेले. एके दिवशी ते दिल्लीतील काही दर्गे आणि इतर ऐतिहासिक स्थळांना भेट देण्याच्या उद्देशाने बाहेर पडले. तेव्हा कोणीतरी नम्रपणे अर्ज केला, “हुजूर! त्या मार्गावर इतके भिकारी बसलेले असतात की तेथून जाणेही कठीण होते.यावर हजरत (अलैहिस्सलाम) फरमावले, आज आपण त्याच मार्गाने जाऊ. आपण सर्वांनाच काही ना काही देऊ.”त्या दिवशी ऐकिवात होते तितके भिकारी भेटले नाहीत; तथापि जे काही याचक भेटले, त्यांपैकी प्रत्येकाने आपल्या विनंतीचे उत्तर प्रत्यक्ष मदतीच्या स्वरूपात मिळवले.

हजरत हाफिज अहमदुल्लाह नागपुरी (रज़ि.) सांगतात, “एके दिवशी हजरत अक्दस (अलैहिस्सलाम) गोल खोलीत विराजमान होते. तेथे सुमारे २० ते २५ लोक उपस्थित होते. हजरत (अलैहिस्सलाम) काही उपदेश करत असतानाच एक फकीर आला आणि मोठ्या आवाजात मदतीची याचना करू लागला.मला ते अत्यंत अप्रिय वाटले, कारण त्यामुळे हजरतांच्या भाषणात व्यत्यय येत होता. म्हणून मी जाऊन दरवाजा बंद केला.हे पाहून हजरत (अलैहिस्सलाम) यांनी आपले भाषण थांबवले आणि मला म्हणाले, दरवाजावर टकटक कर आणि त्या याचकाला आतून काही देण्याची व्यवस्था कर. त्यानंतर त्यांनी फरमावले, ‘याचकाने मदतीची याचना केली म्हणून त्याच्यासमोर दरवाजा बंद करणे योग्य नाही.

हजरत शेख याकूब अली इरफानी (रज़ि.) लिहितात, “मी सन १८९२ पासून कादियानला येत होतो आणि सन १८९८ पासून कायमस्वरूपी हजरत अक्दस (अलैहिस्सलाम) यांच्या सेवेत राहू लागलो. माझ्या समोर अनेक गरजू लोकांनी मदतीची विनंती केली.मी कधीही हजरत मसीह माऊद (अलैहिस्सलाम) यांना एखाद्या याचकाला तांब्याचे नाणे, म्हणजेच कमी किमतीचे नाणे, देताना पाहिले नाही. ते नेहमी चांदीचे नाणे देत असत; म्हणजेच ते याचकांना अधिक मूल्याची मदत करत असत.

एकदा एका फकिराने एकांतात हजरत अक्दस (अलैहिस्सलाम) यांच्याकडे येऊन विनंती केली, मला जंगलात एक विहीर बांधायची आहे, जेणेकरून प्रवाशांना विश्रांती घेता येईल आणि त्यांना

पिण्यासाठी पाणी उपलब्ध होईल.”ही गोष्ट ऐकताच हजरत अक्दस (अलैहिस्सलाम) यांनी त्या उद्देशासाठी त्याला २०० रुपये दिले आणि फरमावले, तू हे कार्य लोकांच्या सेवेसाठी करीत आहेस; म्हणून मी तुला ही रक्कम देत आहे.अशा प्रकारे त्यांनी केवळ मानवसेवेची शिकवणच दिली नाही, तर स्वतः कृतीतून तिचे उत्कृष्ट उदाहरणही घालून दिले.हजरत अब्दुस्समीअ (रज़ि.) वर्णन करतात की, मिर्झा शरीफ अहमद (रज़ि.) यांच्या अकीकाच्या प्रसंगी सर्व पाहुणे मेहमानखान्यात भोजन करत होते. इतक्यात एक गरीब फकीर मदतीच्या आशेने मेहमानखान्यात आला.तेव्हा काही लोक त्याला बाहेर काढू लागले. हे पाहून हजरत अक्दस (अलैहिस्सलाम) यांनी स्वतः त्या फकीराच्या हातात अन्न दिले आणि उपस्थित लोकांना त्याला झिडकारण्यास मनाई केली. त्यांनी फरमावले, ‘तो येथे अन्न खाण्यासाठी आला आहे; त्याला झिडकारू नका.

हजरत मुन्शी ज़फर अहमद (रज़ि.) वर्णन करतात की, एकदा एक मौलवी कादियान येथे आला आणि हजरत अक्दस (अलैहिस्सलाम) यांच्याशी वादविवाद करू लागला. चर्चा हजरत ईसा (अलैहिस्सलाम) यांच्या निधन आणि जीवनाविषयीच्या विषयावर सुरू होती. हजरत अक्दस (अलैहिस्सलाम) यांनी त्याला उत्तर देण्यास सुरुवात केली, तेव्हा तो शांत झाला. हजरतांनी त्याला सविस्तर समजावून सांगितले आणि विचारले, “आता तुला समजले का?” त्यावर त्याने अत्यंत उद्धटपणे उत्तर दिले, “होय, मला समजले की आपणच दज्जाल आहात.” (नऊज़ुबिल्लाह). त्याने पुढे असेही म्हटले की, दज्जालाचे एक लक्षण असे आहे की, तो वादविवादात इतरांना निरुत्तर करतो.हे ऐकूनही हजरत अक्दस (अलैहिस्सलाम) यांनी त्याला काहीही प्रत्युत्तर दिले नाही. तो तेथून निघून गेला.नंतर अमृतसर येथे जाऊन त्याने एक जाहिर पत्रक प्रसिद्ध केले. त्यात या घटनेचा उल्लेख करून त्याने लिहिले की, “हजरत आत गेल्यानंतर मी त्यांच्याकडे एक चिठ्ठी पाठवली, ज्यात मी स्वतःला गरजू असल्याचे सांगून काही आर्थिक मदतीची विनंती केली. त्यांनी तात्काळ मला १५ रुपये पाठवले. ते अत्यंत उदार आहेत.

हजरत काजी अब्दुल गफूर (रज़ि.) वर्णन करतात, सन १९०६ मध्ये मी माझ्या मोठ्या भावासोबत रावळपिंडी येथून कादियानला गेलो. त्या वेळी हजरत अक्दस (अलैहिस्सलाम) मशिदीच्या पायऱ्या उतरून खाली येत होते. तेवढ्यात हकीम शाह नवाज नावाच्या एका व्यक्तीने हजरत अक्दस (अलैहिस्सलाम) यांना नजराणा म्हणून १७ पाउंडांची एक थैली अर्पण केली. हजरत (अलैहिस्सलाम) यांनी ती थैली स्वीकारून आपल्या खिशात ठेवली.खाली एक गरजू याचक उभा होता. त्याने मदतीची विनंती केली. हजरत अक्दस (अलैहिस्सलाम) यांनी क्षणाचाही विलंब न करता तीच थैली आपल्या खिशातून काढली आणि त्या याचकाच्या हातात ठेवली. तेव्हा हकीम शाह नवाज यांनी नम्रपणे अर्ज केला, “हुजूर! त्या थैलीमध्ये १७ पाउंड होते.यावर हजरत अक्दस (अलैहिस्सलाम) फरमावले, “ते त्याच्याच नशिबातील होते; म्हणून त्याच्यापर्यंत पोहोचले.त्या काळात १७ पाउंड ही अत्यंत मोठी रक्कम मानली जात असे.हजरत मिर्झा बशीर अहमद (रज़ि.) यांनी उम्मुल मोमिनीन (रज़ि.) यांच्या संदर्भाने एक रिवायत नोंदवली आहे. ते लिहितात, “माझ्या आदरणीय मातोश्रींनी मला सांगितले की, हजरत साहिब (अलैहिस्सलाम) अत्यंत उदारपणे सदका देत असत. बहुतेक वेळा ते इतक्या गुप्तपणे दान देत की आम्हालाही त्याची कल्पना येत नसे.मी विचारले, ‘ते किती प्रमाणात सदका देत असत? त्यावर मातोश्री म्हणाल्या ‘ते खूप मोठ्या प्रमाणात दान देत असत. विशेषतः त्यांच्या जीवनाच्या अखेरच्या काळात, त्यांच्याकडे जी काही रक्कम येत असे, त्यातील दहावा हिस्सा ते सदकासाठी वेगळा ठेवत असत.

याचा अर्थ असा नव्हता की ते उत्पन्नाच्या दहाव्या भागापेक्षा अधिक सदका देत नसत. उलट, अनेक वेळा आवश्यक खर्च अपेक्षेपेक्षा अधिक होत असत. त्यामुळे सदका देण्यात कोणतीही उणीव राहू नये म्हणून ते आधीच किमान दहावा हिस्सा वेगळा काढून ठेवत, जेणेकरून ती रक्कम इतर कोणत्याही खर्चासाठी वापरली जाणार नाही.सदका देताना ते अहमदी आणि गैर-अहमदी असा कोणताही भेदभाव करत नसत. त्यांच्या स्वभावात हे ठळकपणे दिसून येत असे की, ते कोणत्याही याचकाला कधीही रिकाम्या हाताने परत पाठवत नसत. तसेच, मदतीची विनंती ज्या ज्या सूक्ष्म आणि अप्रत्यक्ष स्वरूपात केली जाई, तीही ते अत्यंत संवेदनशीलतेने आणि बारकाईने ओळखत असत. एकदा कोणीतरी हजरत अक्दस (अलैहिस्सलाम) यांना एक अतिशय सुंदर टोपी भेट म्हणून पाठवली. जेव्हा ते पार्सल त्यांच्या समोर आणण्यात आले, तेव्हा योगायोगाने तेथे एक हिंदू गृहस्थही उपस्थित होता.हजरत (अलैहिस्सलाम) यांनी पार्सल उघडले असता त्यातून ती सुंदर टोपी बाहेर आली. त्या हिंदू गृहस्थाने तिचे मनापासून कौतुक केले. हे ऐकताच हजरत अक्दस (अलैहिस्सलाम) यांनी ती टोपी तत्क्षणी त्यालाच भेट म्हणून दिली.

एका अहमदी बंधू, सरफराज खान यांनी वर्णन केले, “आम्ही जलसासाठी कादियानला आलो होतो. त्या वेळी कोणीतरी हजरत अक्दस (अलैहिस्सलाम) यांना एक घोडी भेट दिली. माझ्या मनात इच्छा निर्माण झाली की, ही घोडी मला मिळावी, मी ती माझ्या गावात घेऊन जावी आणि लोकांना सांगावे की, ‘ही मसीहांची घोडी मी घेऊन आलो आहे.’जलसा संपल्यानंतर मी नम्रपणे अर्ज केला, ‘हुजूर! आता मला परत जायचे आहे.’हजरत (अलैहिस्सलाम) यांनी फरमावले, थोडे दिवस थांबा.’काही दिवसांनी मी पुन्हा परत जाण्याची परवानगी मागितली. तेव्हा हजरत अक्दस (अलैहिस्सलाम) यांनी फरमावले, ‘चौधरी साहेब ही घोडी घेऊन जा.’मी नम्रपणे विचारले, हुजूर! या घोडीची किंमत किती आहे?त्यावर त्यांनी प्रेमाने उत्तर दिले, तिला गवत आणि दाणा घाला आणि तिच्यावर स्वार व्हा—हीच तिची किंमत आहे.

शेवटी हजरत खलीफतुल मसीह यांनी फरमावले:अल्लाह तआला आम्हा सर्वांनाही त्या उच्च नैतिक गुणांनी सुशोभित करो, जे गुण मानवजातीमध्ये रुजविण्यासाठी त्याने हजरत मुहम्मद मुस्तफा (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या पूर्ण आज्ञाधारकतेत हजरत मसीह माऊद (अलैहिस्सलाम) यांना पाठविले होते.

اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ اَعْمَالِنَا مَنْ یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ اَنْ لَّآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہُ اِنَّ اللّٰہَ یَاْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔